RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ५७ (१५)] बुधवार, मे ४, २०२२/वैशाख १४, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ मे २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीडब्ल्यूआर-०३२०/प्र.क्र.६८ (भाग-१)/(१)/राउशु-३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६, मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे, पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (च) आणि (ज१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना "महाराष्ट्र बीअर व वाईन निर्मिती (सुधारणा) नियम, २०२२" असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र बीअर व वाईन निर्मिती नियम, १९६६ च्या नियम २ च्या खंड (नऊ) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(नऊ-अ) **'क्राफ्ट वाईन'** याचा अर्थ फळे किंवा फुले किंवा केळी (देठ म्हणून वर्गीकृत) किंवा तांदुळ यामध्ये साखर किंवा गुळ न घालता, मुख्यतः फळांच्या सालीमध्ये नैसर्गिकरित्या उपलब्ध असलेले किण्व किंवा बाहेरुन टाकलेले किण्व यामुळे आंबवून तयार झालेल्या रसापासून, बाहेरील मद्यार्काचे मिश्रण न करता किंवा कृत्रिम अर्क न घालता, उत्पादीत केलेली आणि मद्यार्क तीव्रता प्रुफ स्पिरीटच्या ४२ टक्क्याहून अधिक नसलेली वाईन असा आहे.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 4th May 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BWR-0320/C.R.68 (Part-1)/(1)/EXC-3.— Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses *(f)* and *(h1)* of sub-section (*2*) of section 143 of Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Manufacture of Beer and Wine (Amendment) Rules, 2022.

2. In rule 2 of the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, after clause *(ix)*, the following clause shall be inserted, namely :—

"*(ix-a)* '*Craft wine*' means wine manufactured by fermenting juice of fruits or flowers or banana (classified as stem) or rice without addition of sugar or jaggery, the fermentation being produced principally by the yeast naturally present on the skin of fruit or added externally, without addition of external alcohol or synthetic flavours and having, alcoholic strength not exceeding 42% of proof spirit.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.